।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४० वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

साप्ताहिक माणदेश वार्ता

संस्थापक संपादक : स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना ६ नोव्हेंबर १९८३

RNI NO. MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD. L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK MANDESH VARTA

सांगोला * जुने वर्ष ४१ वे नवीन वर्ष २१ वे * बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४ (विशेष अंक) * पाने ४ * मूल्य १ ₹ * अंक ३४ वा


# मुंबईचे गणपती सांगोल्यात आणण्याची ६० वर्षाची परंपरा

## भारत गल्ली सार्वजनिक गणेशोत्सव मित्रमंडळाच्या हीरक महोत्सवी वर्षा निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन



सांगोला : सांगोला शहरातील जुन्या व नामांकित मंडळ असलेल्या भारत गल्ली सार्वजनिक गणेशोत्सव मित्रमंडळाचे यंदाचे हीरक महोत्सवी ६० वे वर्ष असून मंडळाने यंदाच्या वर्षी १५ फुटी उंच सुबक व नयनरम्य अशी देखणी सिंहासनावर बसलेली आणलेली आहे.

सन १९६५ मध्ये स्थापना झालेल्या या सार्वजनिक मंडळाचे सांगोला मध्ये मोठे नाव असून मुंबईचा गणपती सांगोल्यात आणून शहरातील गणपती सांगोला सारख्या ग्रामीण भागातील लोकांना पाहता यावे याकरिता या मंडळाने आजपर्यंत अनेक मोठमोठ्या गणपतीच्या सुबक व नयनरम्य मुर्त्या, सजावट, समाज प्रबोधनात्मक सजीव देखावे , थर्माकोलचे म्हैसूर पॅलेस करून सांगोलकरांना मुंबईसारख्या शहरातील मोठ्या गणपतीचा देखावा आजपर्यंत सादर केलेला आहे. मंडळाच्या वतीने आजपर्यंत गेल्या ६० वर्षात अनेक लोकोपयोगी कार्यक्रम घेण्यात आले असून मोफत सर्व रोग निदान शिबिर, मोफत नेत्ररोग शिबीर, महिला भजन स्पर्धा, होम मिनिस्टर, रांगोळी स्पर्धा, रंगभरण स्पर्धा, मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, खाऊ वाटप तसेच मनोरंजनाच्या दृष्टीने पूर्वीच्या काळामध्ये पडद्यावरती चित्रपट मंडळाच्या वतीने दाखवण्यात आलेले होते. मंडळाला आजपर्यंत समाज प्रबोधनात्मक केलेल्या स्त्री भ्रुण हत्या या देखाव्यास महाराष्ट्र शासनाचा राज्यस्तरीय पुरस्कार, तसेच सामाजिक संस्था, पोलीस स्टेशनचे पुरस्कार व अनेक सन्मान मिळालेले आहेत.

अलीकडच्या काळात मराठी पाऊल पडते पुढे, महाराष्ट्राची लोकधारा, लावण्यखणी यासारखे बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम देखील मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहेत. जुन्या काळात रेल्वेने येणारा गणपती म्हणून ख्याती असलेला भारत गल्ली मंडळाचे वैशिष्ट्य होते. पूर्वीच्या काळामध्ये रेल्वेने मुंबईने कुर्डूवाडी पर्यंत गणपती येऊन तिथून कुर्डूवाडीतून बार्शी लाईट रेल्वेने सांगोल्याला छोट्या गाडीतून रेल्वेने हा गणपती सांगोल्याचा स्टेशन वरती यायचा त्या काळातील अबाल वृद्ध लहान मुले तसेच सांगोला शहरवासीय सांगोल्याच्या रेल्वे स्टेशनवर जाऊन भारत गल्लीचा गणपती पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करायचे. लालबाग मुंबईहून गणपती आणून परगावी बाहेर जाऊन चांगल्या व सुबक मुर्त्या उंच आणण्याची प्रथा सांगोल्यात पहिल्यांदा भारत गल्ली गणेशोत्सव मित्र मंडळाने केले असल्याने या मंडळाचे सुबक व देखणी व उंच मूर्ती पाहण्यासाठी भाविकांची नेहमीच गर्दी असते. ६० वर्षा पासून मुंबईहून सुबक व नयनरम्य मुर्ती आणण्याची परंपरा मंडळाने अविरतपणे अगदी कोरोना काळात देखील कायम ठेवली आहे.

गणेशोत्वाचा खर्चाचा वार्षिक अहवाल व स्मरणिका प्रसिध्द करणारे हे सांगोला तालुक्यातील एकमेव गणेश मंडळ आहे.

मंडळाचे यंदाचे हीरक महोत्सवी ६० वे वर्षा निमित्त मंडळाच्या वतीने यंदाच्या वर्षी या निमित्ताने अनेक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले असून बुधवार दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता इयत्ता चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांकरिता रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या रंगभरण स्पर्धेमध्ये मंडळाच्या वतीने चित्र काढलेला कागद देण्यात येणार असून त्या चित्रावर रंग भरून दयाचे आहेत.

बुधवार दि. ११ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता घरगुती गौरी सजावट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले असून सदरची स्पर्धा स्पर्धकाच्या घरी जाऊन परीक्षण करून घेण्यात येणार आहे.

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी तीन वाजता महिला भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

वरील सर्व स्पर्धा करिता प्रथम क्रमांक २००१/–रूपये व ट्रॉफी, द्वितीय क्रमांक १५०१/–रूपये व व ट्रॉफी, तृतीय क्रमांक १००१/–रुपये व ट्रॉफी, उत्तेजनार्थ ५०१/– व ट्रॉफी देण्यात येणार आहे. सर्व बक्षिसांना ट्रॉफी स्व.मारुती शिवाजी सोनवणे (पत्रकार) यांच्या स्मृतिप्रित्यर्थ देण्यात येणार आहे.

वरील स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकांना सहभागाकरिता प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सर्व स्पर्धा या मंडळाच्या मंडपामध्येच होणार आहेत. वरील सर्व स्पर्धांसाठी नांव नोंदणीसाठी तृप्ती पेंशन, अण्णाभाऊ साठे पुतळ्याखाली, शहर पोलीस चौकी जवळ, सांगोला या ठिकाणी नोंदवावी, तसेच अधिक माहितीसाठी मो.नं. ७२४९२९१०४४, ९०२८५९१४३१,९९७०८३११५५ वावरती संपर्क साधावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

तसेच रविवार दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता मोफत नेत्र शिबिर आयोजित करण्यात आले असून यामध्ये पूर्णतः डोळ्याची तपासणी मोफत करून मिळणार आहे व त्यावर उपचार सल्ला देखील मोफत देण्यात येणार आहे.

सोमवार दि. १६ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ठीक १२ वाजता मोफत सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले असून यामध्ये तज्ञ डॉक्टर रुग्णांची तपासणी करून मोफत औषधे देखील देण्यात येणार आहे.

मंगळवार दि. १७ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १ वाजता सत्यनारायण महापूजा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

वरील सर्व स्पर्धा व कार्यक्रमाचा लाभ सांगोला शहरवासीयांनी घ्यावा असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## पडत्या पावसातही दिपकआबांच्या गावभेट दौऱ्याला तुफान प्रतिसाद; वाकी (घे) येथील असंख्य समस्यांचा आबांनी केला जागेवर निपटारा

सांगोला : राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या गावभेट आणि जनसंवाद दौऱ्यास दिवसेंदिवस प्रतिसाद वाढू लागला आहे. वाकी घे. ता. सांगोला येथे मुसळधार पावसातही हजारो नागरिकांनी दिपकआबांच्या गावभेट दौऱ्यास उपस्थिती दर्शवत दिपकआबांचे वाकी गावात जंगी स्वागत केले. पारंपरिक वाद्यांच्या गजरात वाजत गाजत फुलांची उधळण करून आणि शेकडो महिलांनी औक्षण करून आपल्या लाडक्या नेत्याचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी वाकी घे गावात दिपकआबा साळुंखे पाटील यांचे स्वागत केले

. यावेळी वाकी घे गावातील सरपंच अर्चना शिंदे, विकास सेवा सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब शिंदे, रफिक शेख डॉ पुण्यवंत निमंग्रे, तुकाराम घेरडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

रविवार दि ८ सप्टेंबर रोजी दीपकआबा दुपारी ३ ते रात्री ८ वाजेपर्यंत वाकी गावच्या गावभेट आणि जनसंवाद दौऱ्यावर होते. वाकी गावातील मारुती मंदिर, बुद्धविहार, शिंदेवस्ती, खांडेकरवस्ती माळी दाईगडे वस्ती निमग्रेवाडी दिवसे पवार वस्ती या परिसरातील शेकडो नागरिकांशी संवाद साधला.

वाकी घे परिसरातील नागरिकांच्या रस्ते, पाणी, वीज, आणि आरोग्य या विषयी अडचणी जाणून घेतल्या आणि जागेवरूनच सबंधित विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांशी संपर्क करून वाकी घेरडी परिसरातील नागरिकांच्या अडचणी मार्गी



लावण्याच्या सूचना केल्या.

वाकी घेरडी परिसरातील नागरिकांच्या अडचणी जागेवरून निपटारा केल्याने या परिसरातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# सांगोला शहर व तालुक्यात सुमारे २६९ मंडळांकडून गणरायाची स्थापना

## बाप्पांचे उत्साहात आगमन, पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाची प्रतिष्ठापना

सांगोला : गणपती बाप्पा मोरया! मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषात मंगळवारी घरोघरी आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळात 'श्रीं' ची प्रतिष्ठापना करण्यात आली. सार्वजनिक गणेश मंडळांसह सांगोलेकरांनी बाप्पांचे पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात जल्लोषात स्वागत केले. शहरांतील सार्वजनिक गणेश मंडळांनी डीजेला फाटा देत गणरायांची पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढली. त्यामुळे आबालवृध्दांचा उत्साह द्विगुणीत झाला. शहर व तालुक्यात सुमारे २६९ मंडळांनी गणरायाची स्थापना केली.

गणेश मंडळांनी शहरभर उभारलेल्या स्वागत कमानी, कार्यकर्त्यांची लगबग, भक्तीमय वातावरण व गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात दहा दिवसांच्या या उत्साहपर्वाला सुरुवात झाली आहे. सनई-चौघड्यांचा ढोल-ताशांच्या निनादात उत्साहपूर्ण वातावरणात मांगल्याचे प्रतीक असलेल्या बुद्धिदेवता श्री गणरायाची प्रतिष्ठापना करण्यात आली. बाप्पाच्या आगमनासाठी आवश्यक ती तयारी शुक्रवारीच पूर्ण केली होती. शनिवारी सकाळपासूनच घरोघरी गणेशमूर्ती नेण्याची लगबग सुरु होती. छत्रपती शिवाजी महाराज चौक, जयभवानी चौक, महात्मा फुले चौक आदी भागात गणेशमूर्ती सजावटीच्या साहित्यांचे स्टॉल लावण्यात आले होते. 'मोरया मोरया...मंगलमूर्ती मोरया' च्या जयघोषामुळे अवघे शहर दिवसभर मंगलमय झाले होते.

सांगोला शहरातील भारत गल्ली, शनि गल्ली, कोष्टी गल्ली, धनगर गल्ली, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सनगर गल्ली, शिवाजी नगर, फाईट क्लब, महादेव गल्ली, परीट गल्ली, वज्राबाद पेठ, सिदोबा गल्ली, मस्के कॉलनी, लोहार गल्ली, राऊत मळा, शिवाजीनगर, येथील गणेश मंडळानी आकर्षक मूर्त्यांची प्रतिष्ठापना केली.गणरायाच्या स्थापनेसाठी बाजारात फुले, हार, दुर्वा अणि मोदकांची विक्रमी विक्री झाली. आता पुढील दहा दिवस घराघरांमध्ये गणपती बाप्पाची आरतीचा आवाज, आरास पाहणाऱ्यांची गर्दी आणि प्रसाद- मोदकांचा खमंग दरवळ असणार आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सांगोला शहरात, तसेच तालुक्यात मोठा पोलिसबंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मिरवणुकीच्या वेळी चौकाचौकांत पोलिसांची गस्त सुरू होती. डीजेसह इतर कोणतेही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस उभे होते. दिवसभरात कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. शांततेत मंगलमय वातावरणात सर्वांनी बाप्पांची प्रतिष्ठापना केली.

## कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना सहा लाखांच्या धनादेशाचे वाटप

### आ.शहाजीबापूंच्या पत्राची दखल, मुख्यमंत्री सहायता निधीतून मिळाली मदत



सांगोला : कटफख येथील अपघातात मृत्युमुखी पडलेल्या सहा महिलांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचे आदेश मुख्यमंत्री सचिवालयाने सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. शुक्रवार ६ सप्टेंबर रोजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते अपघातात मृत्युमुखी पडलेल्या सहा महिलांच्या नातेवाईकांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. मंगळवार १८ जून २०२४ रोजी पंढरपूर- कराड रोडवरील चिकमहूद जवळ (बंडगरवाडी) पाटी येथे रोजंदारीने कामाला जाणाऱ्या सहा मजूर महिलांचा अपघातात दुर्दैवी मृत्यू झाल्याने कटफळ गावासह तालुक्यावर शोककळा पसरली. या अपघातात ऑशिनी शंकर सोनार, इंदुबाई बाबा इरकर, शिरमाबाई लक्ष्मण जाधव, कमल यल्लाप्पा बंडगर, सुलोचना रामा भोसले, मनीषा आदिनाथ पंडित सर्वजण रा. कटफळ ता.सांगोला यांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता.

आमदार शहाजीबापू पाटील यांनी या घटनेबाबत दुःख व्यक्त करून मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० हजार रुपयांची तसेच जखमी महिलेच्या उपचारासाठी २५ हजार रुपयांची व्यक्तिगत मदत दिली होती. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी संपर्क साधून मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून अधिकची मदत मिळवून देण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. या पत्राची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दखल घेतली असून सकारात्मक प्रतिसाद देत विशेष बाब म्हणून बाब म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या होत्या.

मुख्यमंत्री सचिवालयाचे सहसचिव कैलास बिलोणीकर यांनी सोलापूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करून कटफळ अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी एक लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या होत्या. यावेळी प्रांताधिकारी बी.आर.माळी, नायब तहसीलदार, मंडल अधिकारी प्रशांत जाधव, परमेशर हाके, दत्ता बंडगर, अंबादास हांडे, जेजीनाथ धंगेकर, अजित भिंगे, तानाजी हांडे, विकास खरात आदी उपस्थित होते.

## सामाजिक सलोख्याची परंपरा कायम ठेवण्यासाठी प्रत्येकांने प्रयत्न करणे गरजेचे- डॉ.बाबासाहेब देशमुख

सांगोला : आज गावोगावी विविध समाजातील व विविध धर्मातील तरुण मुले एकत्रीत येऊन मोठ्या प्रमाणात गणेशोत्सव साजरा करीत आहेत.अशा वेळेस सार्वजनिक गणेश मंडळांनी सामाजीक सलोख्याची असलेली आपली परंपरा कायम ठेवण्यासाठी प्रत्येकांने प्रयत्न केले पाहिजेत असे मत पुरोगामी युवक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ.भाई बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

गणेशोत्सव मंडळांनी महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजीत केला गेला तर वेगवेगळ्या समाजातील स्त्रीया या एकत्रीत येऊ शकतात त्यां महिलांमध्ये सुसंवाद घडु शकतो..विचारांची देवाण घेवाण होऊ शकते..व यातुन समाजातील सर्व धर्म समभाव आपोआपच वाढीस लागला जातो.असे अनेक सामाजिक उपक्रम आहेत.पारंपारीक खेळ आहेत.. सांस्कृतीक कार्यक्रम आहेत..विविध स्पर्धा आहेत याचे आयोजन मंडळांनी केलेच पाहिजे.या उपक्रमामध्ये सर्व जाती धर्माचे तरुण-तरुणी व इतर नागरीक सहभागी झाल्याने जातीय व धार्मीक सलोखा आपोआपच वाढला जातो. धार्मीक व जातीय सलोखा वाढल्याने समाजा समाजामध्ये सुरक्षतेची भावना आपोआपच निर्माण होईल. देशाचा,राज्याचा जिल्ह्याचा, तालुक्याचा गावाचा व समाजाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर सर्व धर्म समभाव जपणे गरजेचे आहे.अशा अनेक गोष्टी आपल्या विविध उत्सवाच्या माध्यमातुन केल्या गेल्या पाहिजेत.

गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील प्रमुख उत्सव आहे.या कडे सकारात्मक दृष्टीने पाहीले पाहीजे. गणेशोत्सव हा प्रत्येकांच्या श्रध्देचा विषय आसला पाहीजे अंधश्रध्देचा नसला पाहीजे.काही सार्वजनीक गणेश मंडळांमध्ये रक्तदान शिबिरे ,खाऊ वाटप,शालेय साहित्य वाटप, वकृत्व स्पर्धा,रांगोळी स्पर्धा असे एक ना अनेक उपक्रम राबवत असतात. अशा मंडळाचे अनुकरण इतरही मंडळांनी केले तर हा गणेशोत्सव आणखीन चांगल्या प्रकारे साजरा होईल.

गावोगावी व अनेक शहरांमध्ये सार्वजनीक गणेश मंडळे गणपती बसवत आसतात.या मंडळाध्ये अनेक जाती-धर्माची वेगवेगळी तरुण मुले सहभागी असतात.या मंडळाच्या माध्यमातुन गणेशोत्सव काळात जास्तीत जास्त सामाजीक उपक्रम राबवणे गरजेचे आहे.असे सामाजीक उपक्रम बहुतांश मंडळे परंपरेने राबवतआली आहेत..आशा मंडळाचे अनुकरण इतरही मंडळाने केले पाहिजे असे मत डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी व्यक्त केले.

# डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे पोलीस प्रशासनाचे आवाहन

## गणेशोत्सव व ईद -ए-मिलादच्या पार्श्वभुमीवर सांगोल्यात शांतता समिती बैठक

सांगोला : विधायक व रचनात्मक तसेच पर्यावरण पूरक कार्यक्रमानी गणेशोत्सव साजरा व्हावा, एक गाव एक गणपती संकल्पना राबवण्यासाठी प्रयत्न व्हावे, शांततेत सर्व सण साजरे करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य असून आगामी उत्सव गुण्यागोविंदाने साजरे करुन डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी श्री.विक्रांत गायकवाड यांनी केले.

गणेशोत्सव व ईद -ए-मिलाद च्या पोर्शभूमीवर मंगळवार रोजी पंचायत समितीच्या सभागृहात शांतता समितीची बैठक संपन्न झाली. यावेळी सुरज बनसोडे, अरविंद केदार, किशोर बनसोडे, तुषार इंगळे, बापूसाहेब ठोकळे, अस्मिर तांबोळी, कमरुद्दीन खतीब, रवी कांबळे, दीपक बनसोडे, विनोद रणदिवे, दामोदर साठे, बापूसाहेब भाकरे यांच्यासह गणेश मंडख पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते ,व पोलीस पाटील उपस्थित होते.

पुढे बोलताना विक्रम गायकवाड म्हणाले, यावर्षी दोन्ही धर्मीयाचे सण एकत्र आले आहेत. दोन समाजाने या कालावधीत शांतता व संयम पाळून सण साजरे करावेत, गणपती मंडळानी समाजात तेढ निर्माण होणार नाहीत याची काळजी घ्यावी, तसेच ध्वनी प्रदुषणमुक्त गणेश उत्सव साजरा करण्यावर भर द्यावा. नागरिकानी स्वतः होवून नियम पाळले तर शांततेचा भंग होणार नाही, प्रत्येकाने आपआपली जबाबदारी ओळखून सण आनंदाने साजरे करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

तालुक्यात एक गाव एक गणपती या संकल्पनेवर भर द्यावा, एकोपा ठेवून सामाजिक सलोखा ठेवावा, गणेश मंडळानी विसर्जनाचा मार्ग प्रशासनास कळवावा, सुरक्षितेच्या दृष्टीने गणेश मंडळाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याच्या सूचनाही पोलीस विभागाच्यावतीने देण्यात आल्या.

कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधीत राखण्याकरिता पोलीस दल सक्षम असून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही यावर पोलीसांची करडी नजर असणार असल्याचे पोलीस निरीक्षक भिमराव खणदाळे यांनी सांगितले. या सण-उत्सवाच्या अनुषंगाने काही समाजकंटकाद्वारे सोशल मीडियाच्या माध्यमांतून आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित केल्या जातात. अशा आक्षेपार्ह पोस्टना गावातील तरुणाईने प्रतिसाद न देता याची माहिती पोलिसांना त्वरित द्यावी. सण, उत्सव साजरा करताना धार्मिक, सामाजिक सलोखा टिकून राहील, यासाठी प्रत्येकांनी योगदान द्यावे,' असे आवाहन केले.

पर्यावरण पूरक उत्सव ,तसेच वृक्षारोपण, स्वच्छता, स्त्रीभ्रूण हत्या थांबवाव्या,शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, रक्तदान, आरोग्य तपासणी असे उपक्रम राबवावेत, असे आवाहन करत गणेश उत्सव काळात वीज प्रवाह खंडित होऊ नये, डीजे लावू नये,मंडळानी मूर्ती जवळ स्वयंसेवक नेमावे,प्रत्येक मंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत, कुणाच्याही धार्मिक भावना दुःखऊ नये अशा सूचना केल्या.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४१ वे अंक-४१ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

# सांगोला विधानसभेची पारंपारिक जागा शिवसेनेची; महाविकास आघाडीतून जागा लढविणार- संभाजी शिंदे

सांगोला : सांगोला विधानसभेची शिवसेनेची पारंपारिक जागा आहे. महाविकास आघाडीतूनही ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षातर्फे लढवली जाईल. लवकरच याबाबत पक्षाचे शिष्टमंडळ जावून महाविकास आघाडीच्या प्रमुख नेतेमंडळींना भेटणार असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे यांनी सांगितले.

लोकसभेला काही नेत्यांनी आघाडीचा धर्म पाळला नाही सांगोला येथे सोमवार (ता.९) रोजी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वतीने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे बोलत होते.

या पत्रकार परिषदेसाठी तालुका प्रमुख अरविंद पाटील, जेष्ठ नेते कमरुद्दिन खतीब, युवासेना तालुकाप्रमुख सुभाष भोसले, शिवसेना विधानसभा समन्वयक शंकर मेटकरी, शहरप्रमुख तुषार इंगळे, उपजिल्हाप्रमुख सूर्यकांत घाडगे यांच्यासह प्रमुख नेते मंडळी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे म्हणाले की, सांगोला लोकसभा निवडणुकीच्या वेळी महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेला शेकाप पक्षातील काही नेत्यांनी महायुतीच्या नेत्यांशी संधान साधून मॅनेज झाले होते. त्यांनी आघाडीचा धर्म पाळला नाही. याबाबत महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांजवळ त्यांची तक्रारही दिली आहे. तालुक्यात उघडपणे अवैध धंदे व भ्रष्टाचार सुरू असताना येथे आमदारकीचे स्वप्न पाहणारे नेतेमंडळी ही डोळे झाक करीत बसले आहेत. तालुक्यातील अवैध धंद्याबाबत शिवसेनेनेच आवाज उठवत सामान्य नागरिकांना न्याय देण्याची भूमिका घेतली असल्याचेही जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे यांनी सांगितले.



विधानसभा मतदार संघाची जागा शिवसेना (ठाकरे गट) पक्षाच्या वतीने निश्चितपणे लढवली जाईल. आमच्यासाठी उमेदवार तयार असून मागील विधानसभेत पक्षाने उमेदवारी दिली त्यांनी गद्दारी केल्याने त्यांची जागा निश्चितपणे दाखवली जाईल. सांगोल्यात सध्या कोट्यावधी रुपयांचा विकास निधी आणला असल्याचे सांगितले जात असले तरी याबाबत टक्केवारीमुळे अनेक कामे निकृष्ट दर्जाचे झाले आहेत. सांगोला तालुक्याला टक्केवारीचे ग्रहणच लागले असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

यावेळी उपजिल्हाप्रमुख सूर्यकांत घाडगे, तालुका प्रमुख अरविंद पाटील, शहर प्रमुख तुषार इंगळे यांनी ही आपले मनोगत व्यक्त केले.

# समृध्दी अर्बन सोसायटीच्यावतीने ग्राहकांना दर्जेदार अत्याधुनिक बॅंकिंग सेवा मिळेल : डॉ.प्रभाकर माळी

सांगोला :सक्षम बाजारपेठ असलेल्या सांगोल्यात अजित गावडे यांची समृध्दी अर्बन को.ऑप.क्रे.सोसायटी सुरु झाली आहे. यामुळे नागरिक, खातेदार, व्यापारी, नोकरदार, बचतगट ठेवीदारांची चांगली सोय होणार असून समृध्दी अर्बन सोसायटीच्यावतीने ग्राहकांना दर्जेदार अत्याधुनिक बॅंकिंग सेवा मिळेल, असा विश्वास माजी नगराध्यक्ष डॉ.प्रभाकर माळी यांनी व्यक्त केला.

प्रगतशील उद्योजक श्री.अजितकुमार एकनाथ गावडे यांनी नव्याने सुरु केलेल्या समृध्दी अर्बन को.ऑप.क्रे.सोसायटी लि. सांगोला च्या मुख्य कार्यालयाचे श्रीमती रतनबाई गणपतराव देशमुख यांच्या शुभहस्ते उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी अ‍ॅड सचिन देशमुख म्हणाले, समृध्दी अर्बन को.ऑ.सोसायटीमुळे ग्रामीण भागाचा कायापालट होणार असल्याचे सांगितले.शहरात पैशाची व व्यापारी विचारांची संस्कृती असल्याने येथे समृध्दी अर्बन सोसायटी अधिक घोडदौड करेल, असा विश्वास डॉ.पियुषदादा साळुंखे–पाटील यांनी व्यक्त केला.

खातेदारांना अत्याधुनिक बॅंकिंग सेवा मिळणार असून संगणकीकृत शाखा व प्रत्येक व्यवहाराचे ग्राहकास एसएमएस व्दारे माहिती, सोने तारण कर्ज सुविधा, वाहन कर्ज सुविधा, सहज व सुलभ कर्ज पुरवठा, डेली डिपॉझीट (पिग्मी), एनइएफटी, आरटीजीएस, क्यू आर बारकोड सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. यावेळी डॉ.बाबासाहेब देशमुख, बाळासाहेब एरंडे, शिवाजीराव व्हनमाने, सुरेश आप्पा माळी, मारुती बनकर, उल्हास धायगुडे, दिलीप जानकर, बाबू गावडे, विनोद बाबर, दादाशेठ बाबर, चिदानंद स्वामी, अरुण पाटील, महादेव आप्पा वाघमारे, आण्णासो पांढरे, केतन शेळके,विष्णू देशमुख, इंजि.रमेश जाधव, संतोष मदने, शिवाजीराव वाघमोडे, शिवाजीराव शेजाळ सर, विजय इमडे, गोविंद माळी, दत्तात्रय जानकर, इंजि.मधुकर कांबळे, इंजि.विकास देशपांडे यांच्यासह बॅंकेचे संचालक, कर्मचारी व सांगोला शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी चेअरमन अजितकुमार गावडे म्हणाले, सर्व सभासद , ठेवीदार, हितचिंतक तसेच ज्ञात आणि अज्ञात अश्या सर्वांचे सहकार्य आणि मार्गदर्शन यामुळे संस्था लवकरात लवकर आर्थिक क्षेत्रात व्यवसायाची नवी उंची गाठेल असा विश्वास व्यक्त करत त्याचबरोबर इथून पुढे हि संस्था पारदर्शीपणा,विशासाहर्ता आणि ग्राहकाभिमुखता या मूल्यांचे पालन करून आपणास उत्कृष्ट बॅंकिंग सेवा देण्यास वचनबद्ध राहील असे सांगितले.

सर्वांचे स्वागत चेअरमन अजित गावडे यांनी, प्रास्ताविक डॉ.विजय बंडगर यांनी, आभार प्रदर्शन प्रवीण मोहिते यांनी तर सूत्रसंचालन सौ जाधव मॅडम यांनी केले.



# घिरट्या घालणारा ड्रोन दगडाने जमिनीवर पाडला

सांगोला : सांगोला शहरालगत घीरट्या घालणाऱ्या ड्रोनला गावडे वस्तीवरील तरुण प्रकाश सिद्धेश्वर गावडे याने एका दगडात खाली पाडले आहे व तो पडलेला ड्र ोन वस्तीवरील नागरिकांच्या मदतीने सांगोला पोलीस स्ट`शनला जमा करून याच्या चौकशीबाबत शहरालगतच्या नागरिकांनी लेखी पत्र दिले आहे शहरातील नागरिकांनी गावडे याचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

शहरासह ग्रामीण भागात द्रोण घीरटचा घालत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते त्याचप्रमाणे अनेक भागात चोऱ्या ही वाढले आहेत घेरडी कोळा नाझरे बलवडी महूद कटफळ या भागात द्रोण फिरत असल्याचे लोकांनी फोटो काढून सांगोला पोलीस स्टेशनला पाठवले होते याबाबत राष्ट्रवादीचे माजी आमदार दीपक साळुंखे यांनी चौकशी करण्यासाठी लेखी पत्र ही तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना दिले होते.

या ड्रोण मुळे नागरिकात प्रचंड भीतीचे व दहशतीचे` वातावरण पसरले होते. ८ सप्टेंबर रात्री बाराच्या दरम्यान शहरालगत असलेल्या गावडे वस्ती वरील प्रकाश सिद्धेश्वर गावडे यांच्या घरावरून ड्रोन जात असताना गावडे यांनी पाहिले त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता दगडाने हा ड्रोन खाली पाडला वस्तीवरील लोकांना गोळा करून सकाळी हा ड्रोन पोलिसांच्या ताब्यात देऊन याच्या चौकशीची लेखी मागणी केली याबाबत बोलताना चव्हाण वस्ती वरील दत्ता चव्हाण यांनी याची चौकशी तात्काळ व्हावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.



हा पाचशे मीटर उंचीवरून उडणारा खेळातील द्रोण असल्याचा संशय आहे या द्रोण ची चौकशी सुरू आहे नागरिकांनी घाबरू नये व अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक श्री. भीमराव खणदाळे यांनी केले आहे.

निर्भिड व सडेतोड बातम्या
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता




